**राज्यातील भूसंपादन प्रक्रियेमध्ये विविधस्तरावर प्रलंबित असणाऱ्या प्रकणांचा आढावा घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: न्यायाप्र- २०२६/प्र.क्र. ३५/भूसंपादन-०२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३.०३.२०२६

**<u>वाचा</u> -** मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील रिट याचिका क्र.१३३८१/२०२५ वरील दि.१७.०२.२०२६ रोजीचे आदेश.

**<u>प्रस्तावना -</u>**

जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडील मौजे पिंपरगांव दाणी, ता. पाटोदा, जि. बीड येथील कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग, बीड या भूसंपादन संस्थेच्या गाव तलाव क्र. १ या प्रयोजनासाठी संपादनाखालील क्षेत्राबाबत रिट याचिका क्र.१३३८१/२०२५ (शहादेव मेटे विरुद्ध महाराष्ट्र शासन) मध्ये दि.१७.०२.२०२६ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या सर्वसमावेशक निर्देशानुसार राज्यातील भूसंपादन निवाड्याशिवाय ताब्यात घेण्यात आलेल्या आणि भूसंपादन निवाडा जाहीर होऊनही नुकसान भरपाई अदा न झालेल्या अथवा सक्षम न्यायालय/प्राधिकरणाकडे जमा न केलेल्या प्रकरणांचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने भूसंपादन प्रलंबित प्रकरणांबाबत त्या त्या स्तरावर समिती गठीत करणे व मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार भूसंपादन अभिलेख तयार करण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय पातळीवरील कार्यालयांना निर्देश देण्याची बाब शासनस्तरावर विचाराधिन होती.

**शासन परिपत्रक :-**

उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केल्यानुसार रिट याचिका क्र. क्र.१३३८१/२०२५ मध्ये दि.१७.०२.२०२६ रोजी मा. न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशातील निरिक्षणे विचारात घेऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत :-

१. जिल्हास्तरावरील (i) भूसंपादन निवाड्याशिवाय ताबा घेण्यात आलेल्या खाजगी जमिनीच्या भूसंपादन प्रकरणांचा आणि (ii) भूसंपादन निवाडा जाहिर होऊनही नुकसान भरपाई अदा न झालेल्या अथवा सक्षम प्राधिकरण/न्यायालयात जमा न केलेल्या प्रकरणांचा तपशिल भूसंपादन नोंदवही अभिलेखाच्या स्वरुपामध्ये तयार करण्यात यावा.
२. भूसंपादन प्रकरणांच्या वर्गीकरणानंतर ताबा घेण्यात आलेल्या प्रकरणी निवाडे अंतिम करण्याची तसेच निवाडा जाहिर झाल्यानंतरही नुकसान भरपाईच्या संदर्भात अशी नुकसान भरपाई अदा करणे अथवा सक्षम प्राधिकरण/न्यायालयामध्ये जमा करणे याबाबत भूसंपादन संस्था/प्रशासकीय विभागाच्या सहमतीने तातडीने कार्यवाही करण्यात यावी.
३. भूसंपादन करण्यात येणाऱ्या जमिनी ह्या सर्वसाधारणपणे शेतकरी, निरक्षर व ग्रामिण भागातील असल्याने भूसंपादनाच्या अनुषंगाने सार्वजनिक सुचना व जनजागृती उपक्रम राबविण्यात यावेत तसेच विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून आवश्यक सहाय्य उपलब्ध करुन द्यावे.

४. तसेच भूसंपादन प्रक्रियेच्या विलंबामुळे सार्वजनिक निधीचे लक्षणीय नुकसान होत असल्याने याबाबत अंतर्गत लेखापरिक्षण करावे.

०२. उपरोक्त निर्देशानुसार भूसंपादन प्रकरणाबाबतचा अभिलेख तयार झाल्यानंतर याबाबतचा कालबद्ध आढावा घेण्याच्या अनुषंगाने जिल्हा, महसूली विभाग व राज्य स्तरावर खालीलप्रमाणे समित्या गठीत करण्यात येत आहेत. खालील नमूद जिल्हा भूसंपादन आढावा समितीने दरमहा, विभागीय भूसंपादन आढावा समितीने दर दोन महिन्यांनी आणि राज्यस्तरीय भूसंपादन आढावा समितीने दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा.

**जिल्हा भूसंपादन आढावा समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २) | सरकारी वकील मा. जिल्हा न्यायालय/मा. दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) | - सदस्य |
| ३) | संबंधित भूसंपादन अधिकारी/उपविभागीय अधिकारी | - सदस्य |
| ४) | भूसंपादन संस्थेचे जिल्हास्तरावरील अधिकारी | - सदस्य |
| ५) | जिल्हा भूसंपादन अधिकारी (समन्वय) | - सदस्य सचिव |

**विभागीय भूसंपादन आढावा समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय आयुक्त | - अध्यक्ष |
| २) | विभागीय स्तरावरील विधी अधिकारी | - सदस्य |
| ३) | भूसंपादन संस्थेचे प्रशासकीय प्रमुख (विभागीय स्तर) | - सदस्य |
| ४) | सह आयुक्त/उप आयुक्त (भूसंपादन समन्वय) | - सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय भूसंपादन आढावा समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | अपर मुख्य सचिव (वने,भूसंपादन) | - अध्यक्ष |
| २) | अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) | - सदस्य |
| ३) | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग) | - सदस्य |
| ४) | संबंधित भूसंपादन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव | - सदस्य |
| ५) | सह सचिव (भूसंपादन) महसूल व वन विभाग | - सदस्य सचिव |

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१३१६१००२५९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN SITARAM METKARI

Digitally signed by MITHUN SITARAM METKARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=C5E8236705FDBCCA44E2729131D7F8ECF3D89986EF302C333A751DB3D8202DE1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F9CC4741E617C7D28899024365 2309A7CD19A13FD383DEF17B5669F6F383A116, cn=MITHUN SITARAM METKARI
Date: 2026.03.13 16:11:01 +05'30'

**( मिथुन मेटकरी )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.

२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई

३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (महसूल, नोंदणी व मुद्रांक) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन), मंत्रालय, मंबई.
७) अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मंबई.
८) अपर मुख्य सचिव (नगरविकास विभाग) मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (उद्योग, उर्जा व कामगार विभाग) मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग) मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (जलसंपदा विभाग) मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव (मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण.
१५) उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१६) मुख्य अभियंता, मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे व इतर रेल्वे विभाग.
१७) सर्व विभागीय आयुक्त.
१८) सर्व जिल्हाधिकारी.
१९) सर्व भूसंपादन संस्था व त्यांचे संबंधित प्रशासकीय विभाग.
२०) निवडनस्ती (भूसंपादन-०२)